माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००१६१६**

**अपिलार्थी श्री. मोहम्मद जमाल खान**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ई-२)**
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
तळ मजला, इमारत क्र.३४,
अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ई-२)**
कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
तळ मजला, इमारत क्र.३४,
अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.११.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०२.२०२३ | - | ०३.०४.२०२३ | ३०.०५.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १३.०६.२०२३ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती देण्यात आली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.३०.०५.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १५.०२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार इमारत क्र. ११३- ११५- ए, एवरिडी हाऊस, मौलाना आझाद रोड, आग्रीपाडा, मुंबई यांची दुरुस्ती संदर्भात टेस्ट रिपोर्टची प्रत व अनुषंगीक माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने अपिलार्थीनी दि. ०३.०४.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०५.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती १५ दिवसांत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, व विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी उपस्थित असून तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांचे आवक- जावक नोंदवहीची प्रत सादर केली. जेथे की, दि. १८.०५.२०२३ रोजी अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली होती. अपिलार्थी यांचे म्हणणे की, त्यांना

..२/-

विचारलेली माहिती प्राप्त झालेली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध अभिलेखात आहे व त्याची सॉफ्ट कॉपीची प्रत आहे. अपिलार्थी यांनी माहितीची छायांकित प्रत देण्याची विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २६.११.२०२४**

प्रदीप व्यास
२६-११-२०२४

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission
Greater Mumbai